Publication: Tarankit	Pg No: 3
Edition – Print	Date – 27.09.2021

Four high-impact social entrepreneurs nominated as finalists of the SEOY

श्वाब फाउंडेशन आणि ज्युबिलंट भारत फाउंडेशनतर्फे देण्यात येणाऱ्या 'सोशल आंत्रप्रेनर ऑफ दि इयर'-अवॉर्ड इंडिया २०२१ च्या अंतिम फेरीसाठी चार प्रभावशाली सामाजिक उद्योजकांची नामांकने

पुणे : वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमची संस्था श्वाब फाउंडेशन फॉर सोशल आंत्रप्रेनरशिप आणि ज्युबिलंट भारती ग्रुपची ना–नफा तत्वावर चालणारी संस्था ज्युबिलंट भारतीय फाउंडेशन यांनी आज सोशल आंत्रप्रेनर ऑफ दि इयर (एसईओवाय) अवॉर्ड – इंडिया २०२१ साठीच्या अंतिम फेरीतील नामांकनांची यादी जाहीर केली.

अपर्णा हेगडे, अरमान,सीमा प्रेम, फिया ग्लोबल,प्रांशु सिंघल, करो संभव, शुचिन बजाज, उजाला सिग्नस या यशस्वी प्रभावशाली सामाजिक उद्योजकांची एसईओवाय अवॉर्ड – इंडिया २०२१ च्या अंतिम फेरीसाठी निवड झाली आहे:

विविध कार्यक्षेत्रांची पार्श्वभूमी लाभलेल्या दिग्गज आणि सन्माननीय व्यक्तिमत्त्वांचा समावेश असलेल्या परीक्षक मंडळाकडून पुरस्काराच्या अंतिम विजेत्याची निवड केली जाईल.

'सोशल आंत्रप्रेनर ऑफ दि इयर' अवॉर्ड – भारत २०२१ या पुरस्काराचा मानकरी ठरणाऱ्या सामाजिक उद्योजकाचे नाव गुरुवार, ७ ऑक्टोबर २०२१ रोजी होणाऱ्या व्हर्च्युअल सोहळ्यामध्ये जाहीर केले जाईल. समाजकार्याच्या अपार उर्मीने काम करणाऱ्या या व्यक्तींच्या अनुकरणीय योगदानाचे कौतुक करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या व्हर्च्युअल पुरस्कार सोहळ्यामध्ये जगभरातील अनेक प्रतिष्ठीत व्यक्तींची उपस्थिती असणार आहे.

अनेक आघाड्यांवर सामोरी येणारी आव्हाने पार करत सामाजिक यंत्रणेत बदल घडवून आणणाऱ्या कार्यपद्धतींच्या बळावर सर्वसमावेशक विकास साध्य करण्याच्या प्रवासात कळीची भूमिका निभावत असलेल्या आश्वासक आणि यशस्वी सामाजिक उद्योजकांच्या कामाची दखल घेणे हे एसईओवाय पुरस्कारांचे लक्ष्य आहे.

एसईओवाय अवॉर्ड – भारत २०२१ च्या अंतिम फेरीत पोहोचलेले सामाजिक उद्योजक म्हणजे सामाजिक बदलांना चालना देणाऱ्या अत्यंत तडफदार व्यक्ती आहेत.